**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी — अपीलकर्ता
छ.ताराराणी विकास आघाडी,
शिरोळ. ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
छ.ताराराणी विकास आघाडी,
शिरोळ, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
श्री. एम.टी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा — सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, जि. कोल्हापूर
प्रतिनिधी श्री. बी. एस. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री धर्मनाथ नागरी सहकारी संस्था मर्यादित, जयसिंगपूर हे ठेवीदारांना ठेवी परत देत नसल्याबद्दलची तक्रार आपण केली होती. त्या अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहारावरील कार्यवाहीची, व ठेवी परत न देऊ शकणाऱ्या पतसंस्थांची माहिती विहित मुदतीत व पूर्ण न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

श्री. धर्माधिकारी यांच्या दि. २०.९.२००७ रोजीच्या अर्जाला दि. २०.९.२००७ रोजी उत्तर पाठवून शुल्क कळविण्यात आले. परंतु शुल्क न भरता व ३० दिवसांची मुदत पूर्ण होण्यापूर्वी-म्हणजे दि. १८.९.१००७ च्या अर्जान्वये त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. योग्य ते शुल्क भरून घेऊन अपीलकर्त्यास माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. त्यानंतर काही माहिती देण्यात आली व सर्व ७३४ कागदपत्रांच्या प्रतींसाठी रू. १४६८/- शुल्क भरण्यास पुन्हा कळविले. परंतु माहिती निःशुल्क मिळावी, असा आग्रह श्री. धर्माधिकारी यांनी धरला व ती न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहिती विस्तृत स्वरूपाची असताना आवश्यक शुल्क न भरता केवळ अधिकाऱ्यांकडून दंड वसूल करणे, शिक्षा होणे, शासकीय वेळेचा अपव्यय करणे अपीलकर्त्याला अपेक्षित आहे. तरीही सतत हा ताण राहू नये, म्हणून आपण स्वखर्चाने माहिती तयार केली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ श्री. बी.एस.कटरे यांचे प्रतिनिधी श्री. बी. एस. पाटील यांनी सादर केले. आयोगापुढील सुनावणीच्या वेळी दि. ११.१२.२००८ रोजी आपल्याला ही माहिती मिळाल्याचे श्री. धर्माधिकारी यांनी नमूद केले. तथापि विहित मुदतीत कळविलेले शुल्क भरलेले नाही व शुल्क भरल्यास माहिती त्वरित देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातही नमूद केले होते, हे श्री. पाटील यांनी निदर्शनास आणले.

श्री धर्मनाथ नागरी सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे लोकशाही दिनात दिलेल्या तक्रार अर्जावर सहाय्यक निबंधक, जयसिंगपूर यांनी गांभीर्याने कर्तव्यपालन केले नाही, अशी तक्रार श्री. धर्माधिकारी यांनी लेखी व तोंडी केली. तथापि ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही. श्री. धर्माधिकारी यांना विहित मुदतीत पत्र पाठविल्याच्या

जावक बारनिशीतील नोंदीची प्रत आयोगाला सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, तहसील जयसिंगपूर श्री. बी.एस.कटरे यांनी दि. १५.१२.२००८ च्या पत्रान्वये संबंधित प्रत सादर केली. सबब, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

ॲड. बाबासाो निवृत्ती जाधव — अपीलकर्ता
मु. दरेवाडी, पो.पार्ले तर्फ ठाणे, ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.५.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर
श्री. मिलींद चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा
श्री. पी. बी. माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अ आलेखाप्रमाणे नकाशाची सही-शिक्याची नक्कल न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता ॲड. बाबासो निवृत्ती जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,भूमि अभिलेख, पन्हाळा व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर यांच्या पातळीवर कसून शोध घेऊनही कागदपत्रे अभिलेखात आढळत नव्हते व तशी संपूर्ण कागदपत्रांनिशी कल्पना ॲड. जाधव यांना देण्यात आली होती. मोजणी रजिस्टर नं.५११ / १९९६ चे प्रकरण तालुका निरीक्षक,भूमि अभिलेख, पन्हाळा यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात शोधून काढून पडताळणी केली असता सदर प्रकरणातील मोजणीचे अ-आलेख पेन्सिलचा कच्चा असून नकाशा अंतिम केलेला नाही व हद्दी दाखविण्याची कार्यवाही केली नाही, असे आढळून आले. त्यामुळे मोजणी करून नक्कल देण्याच्या दृष्टीने संबंधितांना नोटिसा काढणे वगैरे प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यामुळे त्यांची तक्रार दूर झाली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा श्री. पी. बी. माने व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर श्री. मिलींद चव्हाण यांनी केले.

आपल्या मागणीनुसार नक्कल मिळणार असल्यामुळे अपील निकाली ठेवण्यात यावे, असे लेखी निवेदन ॲड. जाधव यांनी दि. १०.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक रंगनाथ गोसावी
अमि-बी, ७, विलोज को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
पाईपलाईन रोड, बाळकुंभ, जि.ठाणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक रंगनाथ गोसावी
अमि-बी, ७, विलोज को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
पाईपलाईन रोड, बाळकुंभ, जि.ठाणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.ए.एम.भिलावे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

इनाम जमिनीबाबत असलेल्या नोंदीची प्रत वारंवार मागणी करूनही आपल्याला दिली जात नाही. कनिष्ठधारक व वरिष्ठधारक अशा नोंदी असल्यामुळे सनदेचे व लॅण्ड अलाइनेशन रजिस्टरचे उतारे मिळणे आवश्यक आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विनायक रंगनाथ गोसावी यांनी केले.

श्री.गोसावी यांनी या पूर्वीही या कागदपत्रांची मागणी केली असून सन १८७८ च्या सुमारची ही कागदपत्रे आहेत. फोटो झिंको प्रेससह विविध ठिकाणी शोध घेऊनही सनदा आढळलेल्या नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.ए.एम.भिलावे यांनी केले. सन १९२० चे इनामपत्रक, १८८८-८९ चे खतावणी पुस्तकाचा उतारा आदि प्रती श्री.गोसावी यांना पुरविण्यात आल्या. फलटण तालुक्याचे लॅण्ड अलाइनेशन रजिस्टर गेली वीस वर्षे अभिलेख कक्षात उपलब्ध नाहीत. कसून शोध घेऊनही ते मिळत नाहीत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. रमेश चव्हाण यांनी केले. फोटो झिंको प्रेसमध्ये पुन्हा शोध घेऊन जन माहिती अधिकारी श्री. ए.एम. भिलावे अपिलीय प्राधिकारी श्री. रमेश चव्हाण यांनी १५ दिवसांत अपीलकर्ता यांना त्याबाबत कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

याच विषयाच्या अनुषंगाने, 'संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून नोंदविलेल्या बदलाबाबतची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल,' असे निवेदन तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे (अ.क्र.२६१) यांनी केले होते. श्री.खराडे व निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी याबाबत केलेल्या परिस्थितीचा व निष्कर्षाचा अहवाल आयोगास अद्याप सादर केलेला नाही, तो त्वरित सादर केला जाणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे शास्ती व अन्य कारवाईची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण व तहसीलदार, फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२५.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी, संस्थापक
छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ
मु.पो.ता.शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** — श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ,
मु.पो.ता.शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रतिनिधी डॉ. प्रमोद शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा — कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. जी. टी. पोवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रस्त्याच्या कामात झालेला भ्रष्टाचार उघडकीला येऊ नये, म्हणून जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व भ्रष्टाचाराला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई केली नाही. अकराव्या वित्त आयोगाच्या मंजूर निधीतून काम न करताच पैसे उचलले आहेत, त्यामुळे दोषी कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराबाबत कारवाई करून दंडासह शिक्षा करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली. रस्ता न करताच रक्कम आदा करणे म्हणजे मंजूर रस्त्याचे काम चोरीस गेले आहे. दोषी व्यक्तींकडून रक्कम वसूल करून रस्ता करून मिळावा, अशी मागणीही श्री. धर्माधिकारी यांनी केली.

श्री. धर्माधिकारी यांचा मूळ अर्ज दि. १८/२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झाला. तेथून तो उप अभियंता, बांधकाम, पंचायत समिती, शिरोळ यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तथापि माहिती जिल्हा स्तरावरील असल्यामुळे त्यांनी तो अर्ज दि. २७.८.२००७ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग केला, व त्यानुसार दि. २४.९.२००७ रोजी माहिती घेऊन जाण्याबाबत श्री. धर्माधिकारी यांना कळविण्यात आले. नंतर दि. २६.९.२००७ रोजी माहिती नि:शुल्क देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. जी.टी. पोवार यांनी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती लपविलेली नाही. कामात झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशीची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे त्यांनी श्री. धर्माधिकारी यांना कळविले. माहिती देणे व चौकशीची प्रक्रिया पूर्ण करून संबंधितांवर कारवाई करणे हे दोन भिन्न विषय आहेत. प्रशासकीय कार्यवाहीची मागणी अपीलकर्ता माहितीच्या अधिकारात करीत असून प्रत्येक अपिलाच्या टप्प्यावर मूळ अर्जापेक्षा वेगवेगळे मुद्दे माहिती उपस्थित करीत आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी डॉ. प्रमोद शिंदे यांनी केले. अनुषंगिक कागदपत्रे त्यांनी सादर केली. 'शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे स्तरावरुन अपीलदार

यांचे अर्जात नमूद असलेले काम नव्याने हाती घेण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे, त्यासंदर्भात निविदा मागणी करणे, त्या अंतिम करणे, निधीची उपलब्धता इ. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही त्वरित करावी. तसेच सदर रस्त्याच्या कामासंदर्भातील चौकशीची प्रक्रिया पूर्ण करून त्यामध्ये दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून समाविष्ट असलेली रक्कम वसुलात आणावी.' असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. डी. जी. जाधव यांनी अपिलाच्या निर्णयात दिला. त्यानुसार पुढील कार्यवाही झाली नाही, अशी तक्रार श्री. धर्माधिकारी यांनी केली. मात्र तशी कार्यवाही झाली व त्याबाबतची माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्त्यासोबतच्या चर्चेत ठरले. त्यानुसार दि. २२.५.२००८ च्या पत्रान्वये कागदपत्रांच्या प्रतीसह श्री. धर्माधिकारी यांना कळविण्यात आले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. जी. टी. पोवार यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह केले.

श्री. धर्माधिकारी यांनी मूळ अर्जाव्यतिरिक्त मुद्दे प्रथम व द्वितीय अपिलात उपस्थित केले असून ते प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीचे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही. तसेच कायद्याच्या विहित प्रक्रियेनुसार हे योग्य नाही. तथापि अशा कार्यवाहीचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊन त्यानुसार पार पाडलेल्या प्रक्रियेची माहितीही अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. हे लक्षात घेता अपीलकर्त्यांची शास्ती व अन्य कार्यवाहीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कलगोंडा आण्णा पाटील
मु.पो.जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कलगोंडा आण्णा पाटील
मु.पो.जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

फेरफाराच्या संदर्भात सन १९८८ मध्ये बंडिंग अव्वल कारकून यांनी दिलेल्या आदेशाची प्रत अभिलेख कक्षामध्ये शोधाअंती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी आपल्याला कळविले. या आदेशामुळे फेरफाराची नोंद पोकळ स्वरूपाची व चुकीची झालेली असून ती रद्द होण्यासाठी आपण सन १९८८ पासून प्रयत्न करीत असूनही त्याबाबत दाद घेतली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.कलगोंडा आण्णा पाटील यांनी केले. तथापि या नोंदीबाबत पुर्नविलोकन करण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध असल्याचे प्रथम अपिलाच्या निर्णयात अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले होते. त्यानुसार आपण पुर्नविलोकन अर्ज केल्यानंतर संबंधित नोंद रद्द करण्यात आली. मात्र माहिती अपूर्ण मिळाली, असे प्रतिपादनही श्री.पाटील यांनी केले.

श्री.पाटील यांची मूळ मागणी फेरफार रद्द करण्याचीच होती व ती मान्य झाली आहे. बंडिंग अव्वल कारकून यांचा आदेश क्रमांक व तारीख दिलेली नसून अयोग्य नोंद केल्याचे त्यांचे म्हणणे आहे. अशा स्वरूपाचा आदेश व त्या संदर्भातील कागदपत्रे अभिलेख कक्षात आढळून येत नाही, हे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने यांनी केले.

श्री.पाटील यांचे लेखी व तोंडी निवेदन लक्षात घेता नोंद बेकायदेशीर असून रद्द व्हावी, हीच त्यांची मुख्य मागणी असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अपूर्ण माहिती मिळाल्याची त्यांची तक्रार दखल घेण्यायोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र शिवराम खापरे
हणबर गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

निवासी नायब
**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र शिवराम खापरे
हणबर गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.मुळे

निवासी नायब
**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एन.व्ही.कल्याणकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जागेतील अतिक्रमण काढण्याबाबत विविध पातळ्यांवर आपण प्रयत्न करूनही अतिक्रमण दूर केले जात नाही, याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रामचंद्र शिवदास खापरे यांनी केली.

संबंधित अतिक्रमण झालेली जागा जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या मालकीची आहे. त्यामुळे त्याबाबतची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या कक्षेतील आहे. अतिक्रमण विषयक दंडाची संबंधित व्यक्तीला दिलेली नोटिस श्री.खापरे यांनी अर्जात नमूद केली असून सन १९९२ सालातील अशा प्रकारची कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत, असे त्यांना कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एन.व्ही.कल्याणकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.मुळे यांनी केले.

संबंधित अतिक्रमणविषयक तक्रारीबाबत कागदोपत्री असलेल्या नोंदीनुसार वस्तुस्थितीची पाहणी करून अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी एका आठवड्यात आयोगाला अहवाल सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.मुळे यांनी दि.१५.१२.२००८ च्या

पत्रान्वये आयोगाला सादर केला. अतिक्रमण काढणे-न काढणे याबाबतची पुढील कार्यवाही हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शशिकांत गणपतदास पारेख — अपीलकर्ता
कौस्तुभ, प्लॉट नं.६, फॉरेस्ट कॉलनी,
आदर्शनगर, गोडोली (एमआयडीसी), सातारा

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |
| ३ | उपस्थित | |
| | **अपीलकर्ता** | श्री. शशिकांत गणपतदास पारेख<br>कौस्तुभ, प्लॉट नं.६, फॉरेस्ट कॉलनी, आदर्शनगर, गोडोली (एमआयडीसी), सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | शिक्षण सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे-१<br>डॉ. एस.जी.खतीब |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे<br>श्री. सदानंद शंकरराव शिंदे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे करंजे, ता. सातारा येथील क्षेत्र तत्कालीन मुंबई शासनाने घेतल्याबाबतच्या परिपत्रकाची प्रत बारंवार मागणी करुनही मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. शशिकांत गणपतदास पारेख यांनी केली.

संबंधित परिपत्रक सन १९४० ते १९४२ या काळातील आहे. तसेच अन्य माहितीही सन १९४५ मधील आहे. शिक्षण संचालनालय विभागाचे हे परिपत्रक असून शिक्षण संचालकांच्या स्तरावर ते उपलब्ध होत नाही. १९५८ पासूनचे अभिलेख उपलब्ध आहेत. शेती शाळेच्या जमिनीचा प्रश्न असल्यामुळे कृषि महाविद्यालय, पुणे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. तसेच जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे आदी कार्यालयांकडेही शोध घेण्यात आला. तथापि संबंधित परिपत्रक उपलब्ध झाले नाही, याबाबतची माहिती श्री. पारेख यांना वेळोवेळी कळविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे श्री. सदानंद शंकरराव शिंदे यांनी नमूद केले.

सन १९४०-४२ सालचे परिपत्रक उपलब्ध करण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर योग्य कार्यवाही झाल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. कृषि विद्यालयाकडून अभिलेखगृहाच्या किल्ल्या उपलब्ध करून घेऊन संबंधित परिपत्रकाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते. त्या

अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अहवाल त्वरित सादर केला जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांने मागणी केलेले परिपत्रक कृषि महाविद्यालय, पुणे यांच्याकडून अभिलेखाच्या किल्ल्या उपलब्ध करून घेऊन शोध घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि. २५.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, अन्यथा ते कारवाईस पात्र राहतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोविंद रामा पोवार
बी वॉर्ड, प्लॉट नं.१४, रामानंदनगर, मेन रोड, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.दिपक एकनाथ शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.संजय दत्तात्रय आसवले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली सर्व माहिती राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी समक्ष मिळालेली आहे. त्यामुळे आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.गोविंद रामा पोवार यांनी दि.१५.५.२००८ व दि.११.१२.२००८ रोजी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.११.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. बबनराव राजाराम कोकरे,
मु. धुमाळवाडी, पो. पणदरे, ता. बारामती
जि. पुणे.

अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,
मंगळवार पेठ, पुणे -११.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे विभाग, पुणे -१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५३/पुणे+१०१०/२००९/ पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि. २४/०२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने अर्ज केल्याची तारीख | दि. ०७/०७/२००८ + ११/०५/२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/०८/२००८ + ०३/०६/२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/०८/२००८ + ०६/०७/२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/१०/२००८ |
| ७ | माहिती- मागणी अर्जाच्या (जोडपत्र-अ) छायांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दिनांक २४/०२/२००९ रोजी आयोजित 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये अपील क्र. २७५३/पुणे चा समावेश करण्यात आला होता. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून प्राप्त माहिती ही अनावश्यक दिशाभूल करणारी व चूकीची असल्याची तक्रार श्री. कोकरे यांनी आयोगाच्या प्रपत्रात व दि. ११/०५/२००९ च्या पत्रामध्ये केली. त्या अनुषंगाने आयोगाने संबंधित अपिलीय

प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्याकडून खुलासा मागविला होता.

त्याप्रमाणे अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ यांचेकडून त्यांचे पत्र जा. क्र. पुपामं/प्रलि/रामआ/व्दिअ/६३१४/२००९ दि. ०६/०७/२००९ अन्वये खुलासा प्राप्त झाला. त्यासोबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग यांचे दि. १८/०४/२००९ चे पत्र सादर करण्यात आले आहे. 'श्री. कोकरे यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जानुसार त्यांना माहिती देण्यात आली असून श्री. कोकरे हे वेळोवेळी चूकीची व अपूर्ण स्वरुपाची माहिती मिळत असलेबाबत तक्रार करीत आहेत. तथापि त्यांना कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे आहे, याचा अर्थबोध होत नाही. श्री. कोकरे माहितीच्या अधिकारात या कार्यालयाकडे वारंवार त्याच त्या माहितीबाबत विचारणा करुन खात्याचा विनाकारण वेळ घेत आहेत', असे या पत्रात म्हटले आहे. याच विषयाबाबत श्री. कोकरे यांनी अपील क्र. १०९०/२००९/पुणे व अपील क्र. १२३/२००९/ पुणे ही अपिलेही आयोगाकडे केली आहेत. अशा प्रकारे त्याच त्याच विषयाबाबत पुन्हापुन्हा अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणेचा वेळ व परिश्रम वाया घालवू नये, याची समज श्री. बबनराव राजाराम कोकरे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.माधव बळवंतर करमरकर
बी-६, पंचतंत्र हौसिंग सोसायटी,
सर्व्हे नं.२१०, १३.शिलाविहार कॉलनी,
एरंडवणे, पुणे ४११ ०३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
उप आयुक्त कार्यालय (घन कचरा व्यवस्थापन)
पुणे महानगरपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** आरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७८/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.२५.०२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१०.२००७ |
| ४ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.माधव बळवंत करमरकर यांच्या अपिलाचा समावेश दि.२५.०२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये करण्यात आला होता. त्यामध्ये अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तिन्ही घटकांमध्ये माहितीचे अवलोकन / निरीक्षण (इन्सपेक्शन) बाबत एकमत झाल्याचे प्रपत्रामध्ये नमूद केले आहे.

तथापि, माहितीचे / अभिलेख्याचे निरीक्षण करण्याचे आदेश आयोगाने द्यावेत, अशी विनंती श्री.करमरकर यांनी दि.२१.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी श्री.करमरकर यांना आवश्यक ते अभिलेख निरीक्षणास उपलब्ध करुन द्यावेत व त्याचा पूर्तता अहवाल आयोगास दि.१५.०१.२०१० पर्यंत सादर करावा.

पुणे
दिनांक : ३१/१२/२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ